महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५

(सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक १ ते ३)

(१) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स.

"राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत" या विषयावरील श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५० ला दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील."

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.

"कोसंबी रिठ (ता.पोभुर्णा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांना एमआयडीसीकरिता संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला देणेबाबत" या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९१३ ला दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.

"चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या शेतात लावण्यात आलेल्या सी. आर. आय. कंपनीच्या कृषी सोलर पंपाच्या तक्रारीबाबत" या विषयावरील श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८१० ला दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे

दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

मुख्यमंत्री : महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीतील अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)

चार : औचित्याचे मुद्दे

पाच : शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा.

सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **श्रीमती सना मलिक, सर्वश्री. अतुल भातखळकर, अजय चौधरी, चेतन तुपे, राजकुमार बडोले, संजय केळकर, शंकर मांडेकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अबू आझमी, रोहित पवार, प्रतापराव पाटील चिखलीकर, मंगेश चव्हाण, राम कदम, योगेश सागर, शिवाजी पाटील, श्रीमती देवयानी फरांदे वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य सरकारने धर्मादाय रुग्णालयांना कोट्यवधी रुपयांच्या जमिनी नाममात्र दरात देण्यात येणे, धर्मादाय रुग्णालयांना आयकरात ३०% सवलत, वीज पाणी बीलामध्ये सवलत देऊन या सवलतींच्या बदल्यात धर्मादाय रुग्णालयांनी उपचारातून मिळणाऱ्या एकूण मिळकतीमधील २% निधी 'निर्धन निधी' म्हणून राखून ठेवणे बंधनकारक असणे, या निधीतून गरिब रुग्णांसाठी २०% खाटा राखून ठेवणे, त्यातील १०% निर्धन रुग्णांना विनामुल्य उपचार तर १०% गरिब रुग्णांना ५०% सवलतीच्या दरात उपचार देणे, याकडे धर्मादाय रुग्णालयांनी केलेले दुर्लक्ष, विशेषत: एप्रिल २०२५ मध्ये पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात योग्य पध्दतीने व वेळेवर उपचार न झाल्यामुळे गर्भवती महिलेचा झालेला मृत्यू, राज्यात ४०० पेक्षा जास्त धर्मादाय रुग्णालये असूनही गरीब रुग्णांना नाममात्र दरात उपचार देण्यास रुग्णालयांकडून होत असलेली टाळाटाळ, याबाबत शासकीय यंत्रणांचे झालेले दुर्लक्ष, परिणामी महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजना अशा केंद्र व राज्य शासनाने गरिबांसाठी आरोग्यविषयक योजना आखूनही त्या योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्यामुळे राज्यातील गोर गरिब जनतेला आजारपणात योग्य त्या सोयी-सुविधा मिळत नसल्यामुळे जनतेत निर्माण झालेली भितीची परिस्थिती व जनतेत पसरलेला असंतोष, शासनाने राज्यातील गरिबांना तात्काळ या धर्मादाय

रुग्णालयांमार्फत सर्व आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची आवश्यक ती कार्यवाही, उपाययोजना व शासनाची भुमिका."

(२) सर्वश्री सुनिल कांबळे, भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, सुनिल प्रभू, विजयबापू शिवतारे, शंकर जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील कॅन्टोन्मेंट मतदारसंघांतील प्रामुख्याने वानवडी, पुणे स्टेशन परिसर, आर.टी.ओ ऑफिस ते बंडगार्डन, अलंकार थिएटर ते कॅम्प संपूर्ण परिसर, स्वारगेटला मिळणारे रस्ते, हडपसर रस्ता, खडकवासला विधानसभा मतदारसंघातील प्रामुख्याने सिंहगड रस्ता, धनकवडी, कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, शिवणे, बावधन, भुसारी तसेच वडगाव बुद्रुक, नऱ्हे, धायरी इ. परिसरांमध्ये प्रचंड वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना दररोज अपार त्रास सहन करावा लागत असणे, कार्यालयीन कर्मचारी, शालेय विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व रुग्णवाहिकांना वेळेत पोहोचणे कठीण झाले असणे, या समस्येची मुख्य कारणे म्हणजे पदपथांवरील अतिक्रमणे, बंद/ अकार्यक्षम सिग्नल, समन्वयाचा अभाव, अपुरे वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी, अपुरी पार्किंग व्यवस्था आणि सार्वजनिक वाहतुकीतील विस्कळीतपणा असणे, PMC-वाहतूक पोलीस यांच्यात नसलेला समन्वय यामुळे त्यांची संयुक्त समिती स्थापन करून क्षेत्रनिहाय अतिक्रमण हटाव, स्मार्ट सिग्नल, ट्रॅफिक सेन्सर, सीसीटीव्ही यंत्रणा, सार्वजनिक वाहतुकीचे रूट पुनर्नियोजन, वेळापत्रकाचे काटेकोर पालन, स्वतंत्र लेन, ई-वाहन कॉरिडॉर, सुरक्षित बसथांबे, शाळा व रुग्णवाहिकांसाठी ‘ग्रीन कॉरिडॉर’, नो-पार्किंग झोनमध्ये कडक अंमलबजावणी आणि मल्टी-लेव्हल पार्किंगला चालना, प्रमुख रस्ते व सेवा रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, वाहतूक व्यवस्थापन करिता मुंबईच्या धर्तीवर ट्राफिक प्लॅनर ची नियुक्ती यासारख्या उपाययोजना यांचा अभाव असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) सर्वश्री. अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, विकास ठाकरे, अमित विलासराव देशमुख, संजय मेश्राम, मनोज जामसुतकर, मिहीर कोटेचा, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-

"मुंबई मधील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास व्हावा याकरीता म्हाडा कडून ७९ ए या कायद्याची अमंलबजावणी करण्यात येणे, कायद्याच्या अनुषंगाने कन्सेंट झाल्यावर सर्व प्रथम या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी रहिवाश्यांनी विकासकाची नियुक्ती करणे, विकासकाकडून दिलेल्या मुदतीत काम सुरू न झाल्यास रहिवाश्यांनी स्वत: पुढाकार घेत या इमारतीचा पुनर्विकास करणे, परंतु या दोन्ही प्रकीया ठरलेल्या मुदतीत न झाल्यास म्हाडाकडून या पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात येणे, आतापर्यंत किती इमारतींचा प्रस्ताव म्हाडाकडे आलेला असणे, या ७९ ए नुसार किती इमारतींची नोंद म्हाडाकडे करण्यात आलेली

असणे, सद्य:स्थितीत किती विकासकांनी म्हाडाकडे अशा पुनर्विकास प्रस्तावांची नोंद केलेली असणे, आजमितीस अश्या प्रस्तावांची वस्तुस्थिती तसेच जुन्या व जीर्ण इमारतींचा पुनर्विकास प्राधान्याने होणे अपेक्षित असताना मुंबईमध्ये असणाऱ्या जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत रहिवाश्यांच्या जीवाशी खेळण्याचा प्रयत्न करणा-या विकासकांवर कोणतीही कारवाई शासनाकडून न होणे, याबाबत जुन्या व जीर्ण उपकर प्राप्त इमारतींमध्ये राहणा-या रहिवाश्यांमध्ये असलेले संभ्रमाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(४) श्री.अभिमन्यु पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"राज्यात गावापासून दूर च्या अंतरावर असलेल्या वस्ती, पाडे, तांडे, वाड्यावरील मुलांना प्राथमिक शिक्षण वस्तीवरच उपलब्ध व्हावे यासाठी राज्यातील जवळपास २५०० वस्तीशाळा राज्य शासनाने २००१ पासून सुरु केल्या असणे, सदरील वस्तीशाळेवर ग्रामपंचायतीच्या शिफारशीनुसार गावातील शिक्षित उमेदवारांची नियुक्ती शिक्षण विभागाने केली असणे, सदरील वस्तीशाळांचे रूपांतरण ही जि.प.प्रा. वस्तीशाळा असे नामकरण करून त्याठिकाणी द्वी शिक्षकीय शाळा म्हणून मान्यता देण्यात येणे, सदरील शाळेच्या इमारतींचे बांधकाम जि.प.च्या माध्यमातून पूर्ण झाले असणे, वस्तीशाळा शिक्षक अत्यल्प मानधनावर कार्यरत असल्याने त्यांची उपासमार होत असल्याने या वस्तीशाळा शिक्षकांना डी.टी.एड चे शिक्षण देऊन त्यात उत्तीर्ण शिक्षकांना शासनाने सन २०१४ मध्ये सेवेत कायम केले असणे, अनेक शिक्षक हे सेवानिवृत्त झाले असणे, सदरील वस्तीशाळा शिक्षक यांनी अत्यल्प मानधनावर २००१ पासून २०१४ पर्यंत शिक्षण देण्याचे काम केले असल्याने त्यांची सदरील कालावधीतील सेवा ग्राह्य धरून जुनी पेन्शन योजना व चटोपाध्याय वेतनश्रेणी लागू करण्याबाबत या शिक्षकांची सातत्याने मागणी असणे, सदरील शिक्षकांची २००५ पूर्वीची नियुक्ती असल्याने सदरील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) डॉ.विनय कोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"राज्यातील पाणीपुरवठा संस्थांची कर्ज माफ करण्याची घोषणा माननीय राज्यपाल महोदयांनी त्यांचे अभिभाषणात हिवाळी अधिवेशन २०२४ मध्ये केलेली असणे, तथापि सदर घोषणेप्रमाणे सहकार खात्याकडून कर्ज माफ केलेचा शासन निर्णय पारित न होणे, तसेच अंतिम मंजुरी न होणे, अंतिम मंजुरी न झाल्यामुळे विविध बँकांचे पाणीपुरवठा संस्थांनी/ शेतकऱ्यांनी काढलेले कर्ज परतफेड करण्यासाठी बँकांकडून सतत तगादा लावण्यात येणे, बँकांनी शेतकऱ्यांच्या जमिनी लिलाव प्रक्रिया करून कर्ज वसुलीची कार्यवाही सुरू केलेली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, अशाप्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज

व कर्जमाफीला अंतिम मंजुरी देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री. मुरजी पटेल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये मुंबईतील एकमेव औद्योगिक वसाहत असणे, औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे या ठिकाणी कामगार, कर्मचारी व मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, परंतु या परिसरात शासनाचे किंबहुना महापालिकेचे एकही सुसज्ज रुग्णालय नसणे, त्यामुळे येथील नागरिकांना खाजगी रुग्णालयात उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसणे, येथील कामगार, कर्मचारी व मजुरांची संख्या लक्षात घेऊन भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालया अंतर्गत येत असलेले राज्य विमा योजनेचे (ESIC) हॉस्पिटलची स्थापन करणे, परंतु २०१८ मध्ये सदर हॉस्पिटलला आग लागणे व त्यात जवळपास दहा व्यक्तीचा मृत्यू होणे, तेव्हापासून सदरचे हॉस्पिटल बंद असणे, येथील नागरिकांची रुग्णालयाअभावी होणारी गैरसोय लक्षात घेऊन सदरचे कामगार हॉस्पिटल तातडीने सर्वसामान्यांसाठी सुरू करून त्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना सुरू करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सात : शासकीय विधेयके :

पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

आठ : (बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, सिध्दार्थ शिरोळे, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री दिपक केसरकर, विजय शिवतारे, संजय केळकर, संजय बनसोडे, रमेश बोरनारे, संभाजी निलंगेकर-पाटील, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश सुर्वे, शेखर निकम, ॲड.पराग अळवणी, राजेंद्र गावित, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री अतुल भातखळकर, प्रकाश सोळंके, प्रदीप जैस्वाल, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, अनिल पाटील, किसन कथोरे, शांताराम मोरे, राजकुमार बडोले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री दिलीप लांडे,

महेंद्र थोरवे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, महेंद्र दळवी, डॉ.राहुल आहेर, श्री.तुकाराम काते, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री भिमराव तापकीर, निलेश राणे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीत साटम, सुहास कांदे, सचिन पाटील, रणधीर सावरकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मुरजी पटेल, राम कदम, विश्वनाथ भोईर, दिलीप बनकर, विलास तरे, शरद सोनवणे, कॅ. आर. तमील सेल्वन, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री राजेश मोरे, मिहिर कोटेचा, प्रवीण दटके, हिरामण खोसकर, पराग शाह, चंद्रकांत नवघरे, शंकर जगताप, कालिदास कोळंबकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय उपाध्याय, कुमार आयलानी, मंगेश चव्हाण, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री नरेंद्र मेहता, महेश लांडगे, रविंद्र चव्हाण, अभिमन्यू पवार, डॉ. अतुल भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संतोष दानवे, हेमंत रासने, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, ॲड. राहुल कुल, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, सुनिल कांबळे, सुरेश भोळे, विक्रम पाचपुते, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश वानखडे, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री विलास भुमरे, राजेश बकाने, समीर कुणावार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, सुमित वानखेडे, हरिष पिंपळे, राघवेंद्र पाटील, शिवाजी कर्डिले, सर्वश्रीमती श्वेता महाले, मोनिका राजळे, सर्वश्री चैनसुख संचेती, समीर मेघे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री बबनराव लोणीकर, किर्तीकुमार भांगडिया, प्रशांत बंब, नारायण कुचे, राणाजगजितसिंह पाटील, प्रकाश भारसाकळे, राजू तोडसाम, सुरेश धस, राजेश पवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जितेश अंतापुरकर, डॉ. तुषार राठोड, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, सुभाष देशमुख, विजय देशमुख, मनोज घोरपडे, राहुल आवाडे, अमल महाडिक, धनंजय गाडगीळ, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकाशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व

महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठ्या शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळ्याचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, नितीन देशमुख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संजय पोतनीस, बापूसाहेब पठारे, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, अभिजीत पाटील, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, संदिप क्षिरसागर, नारायण पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर, बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्याचे कृषी मंत्री सिन्नर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना त्यांनी" ढेकळांचे पंचनामे करायचे का ?" असे शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे केलेले वक्तव्य, जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदार संघात" हर घर सौर" योजनेवरील एका कार्यक्रमात सत्तारुढ पक्षाच्या एका विधीमंडळ सदस्याने " आपल्यामुळे कपडे, बुट, मोबाईल योजनांचे आर्थिक फायदे आणि पेरणी करण्यासाठी पैसे मिळतात" असे शेतकऱ्यांना उद्देशून उद्‌गार काढणे, मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील सर्वच भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार झालेला पाऊस, त्यामुळे अनेक जिल्ह्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती, नद्यांचे पाणी पात्राबाहेर जाणे, अनेक ठिकाणी दरडी कोसळून विस्कळीत झालेली वाहतूक, केळी, पेरु, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळपिकांचे झालेले मोठे नुकसान, राज्य सरकारने नुकसानीबाबत पंचनामे त्वरित करणे व शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटपात विविध जिल्ह्यात झालेले भ्रष्टचार, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे झालेले नुकसान, दरवर्षी मे, महिन्यात कोकणात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु यावर्षी अतिवृष्टीमुळे पर्यटकांची संख्या कमी होणे व पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या पर्यटन व्यावसायिकांचे झालेले अतोनात नुकसान, दरवर्षी कोकणात साधारणपणे २३ मे पासून भात आणि नागलीची पेरणी सुरु होते, परंतु यावर्षी १५ मे पासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे पेरणी पूर्वीची कामे न होणे, तसेच रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांच्या कापणीची कामे सुरु असतांनाच पाऊस सुरु झाल्याने भात मातीत मिसळून पूर्णपणे वाया जाणे, कोकणातील सदरहू परिस्थिती पाहता कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता शासनाने विशेष मदतीचे पॅकेज जाहिर करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विशेष आर्थिक पॅकेज जाहिर करण्याची आवश्यकता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, राज्य शासनाने कृषि क्षेत्राला अग्रेसर ठेवण्यासाठी महाॲग्रो एआय धोरणास (२०२५ ते २०२९) शासनाने दिलेली मंजूरी, एका रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, शेतकऱ्यांना कृषी विम्याची रक्कम दिली जात नसून विमा कंपन्यांना कृषि विम्याचा लाभ झाला असणे, संपूर्ण राज्यात बोगस बीटी बियाण्याचा धुमाकूळ सुरु असून यावर्षी बोगस बीटी बियाणे ३० टक्क्यापेक्षा जास्त विकले गेल्याची बाब निदर्शनास येणे, बिटी बियाणांची

बिनधास्त विक्री सुरु असून त्यांचे बिंग फुटू नये म्हणून बियाणे लेबलविना, खुल्या पाकिटमध्ये विकले जात असणे, शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा निवडणूकी अगोदर केली असून अद्यापही सरसकट कर्जमाफीची घोषणा न करणे, कापसाच्या पालवीवर वाणी नावाचा रोग आला असून त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाचे पैसेही अद्याप मिळालेले नसणे, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भ व मराठवाड्यातील २६७ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बऱ्याच कुटुंबियांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, विदर्भातून गोव्याला जाण्यासाठी ८६ हजार कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग करण्याची आखलेली योजना, वास्तविक पाहता या अंतर्गत असलेल्या मंदिरांकडे जाण्यासाठी तयार असलेल्या उत्तम रस्त्यांचे जाळे, शक्तिपीठ महामार्गामध्ये १२ जिल्ह्यातील शेतकरी बाधित होणार असल्याने दि.१.७.२०२५ पासून १२ जिल्ह्यात व संपूर्ण महाराष्ट्रात रास्तारोको आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काढून घेण्यात येणाऱ्या सुपिक जमिनी या मार्गासाठी लाखो झाडांची होणारी कत्तल व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, यासाठी राज्य शासनाने नुकतीच २० हजार कोटीची तरतूद करणे व शेतकऱ्यांच्या विरोध असतानाही दडपशाही करुन शेतकऱ्यांच्या जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी घेतल्या जाणार असणे, दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील समृद्धी महामार्ग वाहून जाणे, सदर मुसळधार पावसामुळे सोलार पंपासह संपूर्ण सेट, पाईप लाईन, स्प्रिंकलर सेट, केबल इत्यादी वाहून जाणे, सिबिलची अट व ओटीएस ची अट केल्यामुळे बँकेतर्फे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज न मिळणे, तसेच राज्य शासनाने नोकरभरतीमध्ये कंत्राटी भरती केली असून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने वेतन मिळालेले नसणे, लिपिकाला १२ हजार, शिपायांना १० हजार इतका तुटपुंजा पगार दिला जाऊन एजन्सीला जास्तीत जास्त फायदा कमवून दिला जाणे, राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्य पदी वादग्रस्त कारकीर्द राहिलेले विशेष पोलिस महानिरिक्षक दिलीप भुजबळ यांची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे कामगारांची व बेरोजगारांची फसवणूक केली जात असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)

(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.

"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करुन अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी

१३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करुन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) श्री. रईस शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.

"अनाथ विद्यार्थ्यांना पालक व पालकत्व नसल्यामुळे शिक्षणामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कोणत्याही संस्थेने शिक्षण देण्याकरिता आपला हात पुढे केला असला तरी त्यांना शिक्षणासाठी येणारा खर्च देण्यास शिक्षण संस्थेकडे निधीची कमतरता असल्यामुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, खाजगी मदतीवरच अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च अवलंबून असणे, दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी महिला व बालविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला असणे सदर शासन निर्णयामध्ये अनाथ विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाचे शुल्क भरण्याची तरतूद केलेली नसणे, त्यामुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, अनाथ विद्यार्थ्यांसाठी "थेट शिक्षण शुल्क भरपाई योजना" राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील मुल-मारोडा येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत शासकीय कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी रुपये ३५ कोटी निधी मंजूर असणे, परंतु इमारत बांधकामासाठी जागेच्या अडचणीमुळे इमारत बांधकामासंदर्भात विलंब होत असणे, सदर जागा वन विभागाच्या नावाने पंजीबध्द असणे, मुल मारोडा येथे शासकीय कृषी महाविद्यालयासाठी महाविद्यालय इमारत, मुलांचे वसतीगृह, मुलींचे वसतीगृह, संरक्षण भिंत आदींचे बांधकाम करण्याची

आवश्यकता असणे, ही जागा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या नावाने हस्तांतरीत करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात अनेक अडचणी असल्याने त्या दूर करून जमीन हस्तांतरणाची कार्यवाही जलदगतीने करण्याची आवश्यकता असणे, सदर सर्व्हे नंबर मोठ्या झाडांचे जंगल व झुडपी जंगल यांच्या नावाने असल्याने निवर्णीकरण करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात महाविद्यालय इमारत बांधकामास विलंब होत असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : २ जुलै, २०२५.

जितेंद्र भोळे,
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.